# फळपिक लागवड व हवामानावर आधारित फळपिक विमा योजना


डॉ. हर्षा हेमंत कौसडीकर
आचार्य पदवीधर विद्यार्थिनी,
कृषी अर्थशास्त्र विभाग,
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

भारतासारख्या कृषिप्रधान देशामध्ये ७० टक्के लोक हे शेतकरी वर्गातले असूनही शेतीची सद्यस्थिती हि बहुतेक वेळा उदासीन दिसून येते. असे का होते? याची अनेक कारणे आहेत, जसे की, हवामानातील सततचा बदल, दुष्काळी परिस्थिती, शेतमालास योग्य भाव न मिळणे, शेतीमधील पारंपारिक पिके व त्यांच्या लागवड पद्धती वगैरे. परंतु सद्यस्थितीत शेतमालाला योग्य भाव न मिळणे हि एक मोठी समस्या ठरत आहे. राज्यात अनेक प्रकारची शेती केली जाते, अन्नशेती, फुलशेती, बागायती शेती, भाजी शेती, हरितगृह शेती. त्याचबरोबर शेती व्यवसायाला जोडधंदा म्हणून शेळीपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय हे व्यवसायही केले जातात. परंतु या सर्व प्रकारच्या शेतीच्या आणि जोडधंद्याच्या तुलनेत फळबाग लागवडीमध्ये चांगली कमाई होऊ शकते. या पार्श्वभूमीवर पारंपारिक पिकांना फळबागाची जोड देणे हि बाब अतिशय फायदेशीर ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महाराष्ट्रात प्रामुख्याने केळी, आंबा, संत्रे, मोसंबी, द्राक्षे आणि डाळिंब या फळ पिकांचा महत्वाचा वाटा आहे. फळांपासून तयार केलेल्या टिकाऊ पदार्थांची आणि ताज्या फळांची देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारातही बारमाही मागणी असून योग्य तो भाव मिळत असल्याचे दिसून येते. आखाती देश, युरोपियन देश, शेजारील राष्ट्रे- बांग्लादेश, श्रीलंका, नेपाळ तसेच इतरही काही देशांकडून फळांची मागणी वाढत आहे. विशेषकरून जानेवारी ते जून या काळात विविध देशांमध्ये उपलब्ध नसणारी परंतु आपल्याकडे उपलब्ध होणारी फळे निर्यात करण्याची संधी निर्माण झाली आहे. या निर्यातीमुळे गुणवत्तापूर्वक फळे पिकविणाऱ्या फळबागायतदारांना योग्य बाजारभाव मिळाल्यामुळे फायदा तर होतोच त्याचबरोबर देशाला परकीय चलन प्राप्त होते.

फळांना निर्यातीसाठी दिली जाणारी चालना यामुळे फळबागांची लागवड खात्रीशीर यशस्वी ठरत आहे. याच अनुषंगाने राज्य व केंद्र सरकारने फळबाग लागवडीसाठी अनुदानासह विविध योजना सुरु केल्या आहेत.

## १) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना:




हि १०० टक्के केंद्र पुरस्कृत अशी अतिमहत्त्वाकांशी योजना महाराष्ट्रात सन २०११-१२ पासून सुरु करण्यात आली. शेतकऱ्यांना त्यांच्या स्वत:च्या शेतजमिनीवर फळबाग लागवड करुन रोजगार निर्मिती करणे व त्यांचा आर्थिक स्तर उंचविणे, फळबाग लागवड करुन जमिनीवर शेतीपुरक व्यवसायात वाढ करणे. शेतजमिनीवर फळबाग लागवड करुन जमिनीवर आच्छादन निर्माण करणे व जमिनीची धूप कमी करणे, तसेच पर्यावरणाचा समतोल राखणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहेत.

लाभार्थी पात्रता:

- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी, भूसुधारक योजनेचे लाभार्थी, इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी
- कृषि कर्ज माफी योजना २००८ नुसार, लहान शेतकरी (१ हे. पेक्षा जास्त परंतु २ हे. पेक्षा कमी जमीन असलेले जमीन मालक व कुळ). सीमांत शेतकरी (१ हे. पेक्षा कमी जमीन असलेले जमीन मालक व कुळ)
- अनुसूचित जमातीचे व अन्य परंपरागत वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम २००६ नुसार पात्र व्यक्ती.
- मग्रारोहयो साठी जॉब कार्ड धारक वरील १ ते ७ प्रवर्गातील कोणतीही व्यक्ती.
- इच्छुक लाभधारकाच्या नावे जमीन असणे आवश्यक आहे. हि जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास ७/१२ वर कुळाचे नाव असेल तर योजना कुळाच्या संमतीने राबवण्यात येते.

अर्ज कुठे करावा:

- तालुका कृषि अधिकारी कार्यालयात.

कलमे / रोपे कोठून खरेदी करावीत:

कृषि विभागाच्या रोपवाटिका, कृषि विद्यापीठाच्या रोपवाटिका, खाजगी शासन मान्य रोपवाटिका, मग्रारोहयो अंतर्गत ग्रामपंचायतीच्या रोपवाटिका, सामाजिक वनीकरण विभाग किंवा अन्य शासकीय रोपवाटिका

योजनेत समाविष्ट फळपिके:

कलमे: आंबा, काजू, चिकू, पेरू, डाळिंब, संत्रा, मोसंबी, लिंबू, सिताफळ, आवळा, कोकम, फणस, अंजीर.

रोपे: आंबा, नारळ, बोर, सिताफळ, आवळा, चिंच, कवठ, जांभूळ, फणस, सुपारी, कोकम, बांबू, करंज, लिंबू, नारळ, साग, गिरिपुष्प, सोनचाफा, कडीपत्ता, कडुलिंब, सिंधू, शेवगा, हादगा, जट्रोफ़ा, करंज व इतर औषधी वनस्पती (अर्जुन, असन, अशोक, बेहडा, बेल, हिरडा, टेटू, डीकेमाली, रक्त चंदन, रिठा, लोध्रा, आइरन, शिवन, गुग्गुळ, वावडिंग, बिब्बा रोपे इ.).

लागवड कालावधी: जुन ते मार्च

## २) भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना



जे शेतकरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी पात्र ठरु शकत नाहीत त्यांच्यासाठी राज्य सरकार हि योजना सन २०१८-१९ पासून सुरु करण्यात आली आहे.

लाभार्थी पात्रता:

- सर्व प्रवर्गाअंतर्गत ज्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाची उपजीविका केवळ शेतीवर अवलंबून आहे त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल व त्यानंतर अन्य शेतकऱ्यांचा विचार करण्यात येईल.
- लाभ वैयक्तिक शेतकऱ्यांना देय आहे. संस्थात्मक लाभार्थ्यांना देय नाही.
- शेतकऱ्यास स्वत:च्या नावावर ७/१२ असणे आवश्यक आहे. संयुक्त मालकी असल्यास इतर खातेदारांच्या संमतीने शेतकऱ्यास स्वत:च्या हिश्याच्या मर्यादेत लाभ घेता येईल.
- ७/१२ वर कुळाचे नाव असल्यास कुळाची संमती आवश्यक आहे.
- परंपरागत वन निवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम २००६ नुसार वनपट्टे धारक शेतकरी लाभ घेण्यास पात्र आहेत.
- इतर शासकीय योजनेतून फळबाग लागवड केली असल्यास ते क्षेत्र वगळून वरील

विभागानुसारच्या क्षेत्र मर्यादित शेतकऱ्यास लाभ घेता येईल.

योजनेत समाविष्ट फळपिके:

कलमे: आंबा, काजू, पेरू, डाळिंब, संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू, सिताफळ, आवळा, कोकम, फणस, अंजीर, चिकू.

रोपे: नारळ (वानावली, टी/डी), चिंच, जांभूळ.

लागवड कालावधी: मे ते नोव्हेंबर

योजनेची ठळक वैशिष्ट्ये:

- योजनेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्यांना मंजूर अनुदान पहिल्या वर्षी ५०%, दुसऱ्या वर्षी ३०% आणि तिसऱ्या वर्षी २०% अशा तीन वर्षात देण्यात येणार असून लाभार्थी शेतकऱ्याने दुसऱ्या व तिसऱ्या वर्षीच्या अनुदानाचा लाभ घेण्यासाठी लागवड केलेल्या झाडांचे जीविताचे प्रमाण बागायती झाडांसाठी ९०% तर कोरडवाहू झाडांसाठी ८०% ठेवणे आवश्यक आहे. हे प्रमाण कमी झाल्यास शेतकऱ्याने स्वखर्चाने झाडे आणून पुन्हा जिवंत झाडांचे प्रमाण विहित केल्याप्रमाणे राखणे आवश्यक आहे.
- या योजनेत भाग घेण्यासाठी शेतकरी कोकण विभागात कमीत कमी १० गुंठे तर जास्तीच जास्त १० हे. आणि इतर विभागात कमीत कमी २० गुंठे तर जास्तीच जास्त ६ हे. क्षेत्र मर्यादित लाभ घेऊ शकतो.
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत पात्र लाभार्थींना प्रथम त्या योजनेतील निकषाप्रमाणे लाभ घेणे आवश्यक आहे, उर्वरित क्षेत्रासाठी (वरील क्षेत्र मर्यादेच्या अधीन राहून) लाभार्थी या योजनेतून लाभ घेऊ शकतात.
- अल्प, अत्यल्प भूधारक, महिला आणि दिव्यांग शेतकऱ्यांना या योजनेत प्राधान्य आहे.
- या योजनेत लाभ घेण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसाचे आत शेतकऱ्याने विहित नमुन्यात संबंधित कृषी विभागाकडे अर्ज करावा. तद नंतर संबंधित तालुक्याला दिलेल्या लक्षांकापेक्षा जास्त अर्ज आल्यास जाहीर सोडतीद्वारे (Lottery) पद्धतीने लाभार्थी निवड करून, निवड झालेल्या लाभार्थींना पूर्व संमती पत्र दिले जाईल. पूर्व संमती मिळाल्यानंतर ७५ दिवसांचे आत लाभार्थ्याने लागवड पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची पूर्व संमत्ती रद्द समजून पुढील शेतकऱ्यास पूर्व संमती दिली जाईल.

| शासन योजनेत अनुदानीत बाबी (१००% शासन अनुदान) | लाभार्थी शेतकऱ्याने स्व: खर्चाने करावयाच्या बाबी (यास शासनाचे अनुदान नाही) |
|---|---|
| झाडे लागवडीसाठी खड्डे खोदणे, ठिबक सिंचन बसविणे, कलमे / रोपे लागवड करणे, पिक संरक्षण औषधे, नांग्या भरणे | लागवडीसाठी जमीन तयार करणे, सुपीक माती, शेणखत मिश्रणाने खड्डे भरणे, रासायनिक खत टाकणे, आंतर मशागत करणे, काटेरी झाडांचे कुंपण करणे (ऐच्छिक) |

३) हवामानावर आधारित फळपिक विमा योजना



प्रधानमंत्री पीक विमा योजनेप्रमाणेच २०१८ पासून महाराष्ट्र राज्यात हवामानावर आधारित पुनर्रचित "फळपिक विमा योजना" लागु

करण्यात आली. मृगात सहा फळपिकांसाठी १८ जिल्ह्याचा तर आंबिया बहारासाठी आठ फळपिकांसाठी २३ जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे.

मृग बहारात संत्री, मोसंबी, पेरू, चिकु, डाळिंब, लिंबु करिता, तसेच आंबिया बहारात संत्री, मोसंबी, पेरू, डाळिंब, द्राक्षे, काजु, केळी, आंबा व प्रायोगिक तत्वावर स्ट्रॉबेरी साठी विमा उपलब्ध राहील.

या योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावा लागेल. या योजनेत एकुण विमा हप्त्याच्या केवळ ५ टक्के रक्कम हि शेतकऱ्यांना भरावी लागते उर्वरित रक्कम की केंद्र व राज्य सरकार यांच्याकडून अदा केली जाते.

तसेच तीन विमा कंपन्यांचा या योजनेमध्ये सहभाग असून त्यांचे कार्य हे पुढील जिल्ह्यामध्ये रहील.

| विमा कंपनीचे नाव | जिल्हा |
|---|---|
| एचडीएफसी ॲग्रो जनरल इन्शुरंस कंपनी | अमरावती, सिंधुदुर्ग, नाशिक, अहमदनगर, वाशीम, यवतमाळ, सातारा, परभणी, कोल्हापुर, लातूर, जालना |
| बजाज अलायांस जनरल इन्शुरंस कंपनी | रायगड, बुलढाणा, नांदेड, जळगाव, पुणे, उस्मानाबाद |
| भारतीय कृषि विमा कंपनी | धुळे, पालघर, सोलपुर, रत्नागिरी, नागपूर, नंदुरबार |

**अर्जाची मुदत:**

मृग बहाराच्या मोसंबी व चिकु पिकांसाठी ३० जुन, संत्रा पिकासाठी २० जुन, पेरू पिकासाठी १४ जुन (२०२१ व २०२२ साठी), डाळिंब पिकासाठी १४ जुलै. आंबिया बहारामधील द्राक्ष पिकासाठी १५ ऑक्टोबर, मोसंबी व केळी साठी ३१ ऑक्टोबर, संत्रा व काजु आणि कोकणातील आंबा पिकासाठी ३० नोव्हेंबर, तर उर्वरित महाराष्ट्रातील आंबा पिकासाठी आणि डाळिंब पिकासाठी ३१ डिसेंबर, स्ट्रॉबेरी साठी १४ ऑक्टोबर पर्यंत अर्ज करता येतील.

योजनेत सहभागी होण्यासाठीचा अर्ज महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. योजनेच्या सविस्तर माहितीसाठी व योजनेत सहभागी होण्यासाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर योजना राज्य शासनाच्या कृषि विभागामार्फत राबविली जात आहे. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे अल्प, अत्यल्प भूधारक, महिला आणि दिव्यांग शेतकऱ्यांना प्राधान्य आहे. त्यामुळे बहुतांश शेतकऱ्यांनी याचा जोडव्यवसाय म्हणून विचार करायला हवा.

ग्लोबल वॉर्मिंगमुळे सद्य:स्थितीत पूर, वादळ, बेमोसमी पाऊस, धुके, गारपीट या नैसर्गिक आपत्तींचा वारंवार सामना करावा लागतो. काही फळपिकांसाठी उपलब्ध असलेल्या "पीक विमा" योजनेमुळे शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीत काही प्रमाणात नुकसान भरपाई मिळण्याची सोय उपलब्ध झाली. फळबाग लागवड यशस्वी करण्यासाठी अनेक खासगी तसेच सहकारी संस्था कार्यरत आहेत. अनेक ठिकाणी बागायतदारांचे लहान-मोठे संघ, कृषि प्रतिष्ठान, महाग्रेप, राष्ट्रीयकृत बँका या फळबाग लागवड, उत्पादन आणि विक्रीसाठी विविध प्रकारे मदत करत आहेत. तरी शेतकऱ्यांनी फळबाग लागवडीचा गांभीर्याने विचार करून स्वत:ला आणि देशाला सशक्त करावे.

(संपर्क: +९१ ७७६७९७१२१८)

★ ★ ★